सामना
ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
संस्थापक संपादक : बाळ ठाकरे
मुंबई, मंगळवार, १२ नोव्हेंबर २०१९ | वर्ष : ३१ अंक : २८९ | पृष्ठे १२ | मूल्य : ४.०० रुपये | ★★ शहर आवृत्ती

## आदिवासींचा जीवनपट कॅनव्हासवर



आदिवासी जीवन जवळून अनुभवण्याची संधी प्रत्येक वेळी मिळतेच असे नाही. मुंबईच्या जवळच असलेला पालघर जिल्हा. यात प्रामुख्याने आदिवासी जीवन दिसते. या आदिवासी जीवनाचे चित्रण पाहण्याची संधी मुंबईकरांना मिळाली. चित्रकार रिचा अग्रवाल यांच्या चित्रांचे प्रदर्शन ८ते ११ नोव्हेंबरदरम्यान भरवण्यात आले होते. पालघर जिल्ह्यातील आदिवासी जीवनाचा अनुभव रिचा यांनी चित्र कलाकृतीतून रेखाटला असून हा कलाविष्कार पाहण्याची मुंबईकरांना संधी मिळाली. पालघरच्या दुर्गम भागात रिचा यांनी भेट दिली. तेथील महिलांशी संवाद साधला. रोजच्या जगण्यात संघर्ष असूनही आनंदी राहणाऱ्या या महिलांनी रिचा यांना प्रभावित केले असून त्यांनी आपल्या भावना थेट कॅनव्हासवर उतरवल्या.